अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई–३०
दुरध्वनी क्र.– ०२२–२४९२१२१२, २४९२२६१८
Email - addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
दिनांक :– १७/०७/२०२५

## –: प्रेसनोट :–

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद कमांक | २२/२०२५ |
| कलम | कलम ७ भ.प्र.अधिनियम १९८८. |
| आरोपी लोकसेवक | श्री. दयानंद धनाजी चव्हाण, वय ४७ वर्षे सहकार विभाग पॅनलचे वरील प्राधिकृत अधिकारी तथा प्रमाणित लेखापरीक्षक, सहकार विभाग, आर नॉर्थ, मुंबई |
| लाचेची मागणी | रू.१,१०,०००/- |
| स्विकारलेली रक्कम | रु. ५०,०००/- |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांनी एका सोसायटीमध्ये फ्लॅट खरेदी केला आहे. सदर सोसायटीची कार्यकारी कमिटी बरखास्त झाली असल्याने सहकार विभागाने लोकसेवक यांची सदर सोसायटीवर सहकार विभागाचे पॅनल वरील प्राधिकृत अधिकारी तथा प्रमाणित लेखापरीक्षक म्हणून नेमणूक केली होती. तक्रारदार यांनी सोसायटी शेअर्स सर्टिफिकेट मिळण्याकरीता लोकसेवक यांच्याकडे अर्ज केला असता, लोकसेवक यांनी सोसायटी शेअस सर्टिफिकेट तक्रारदार यांच्या नावे करून देण्यासाठी तक्रारदार यांचेकडे रू. १,१०,०००/- लाचेची मागणी केली. परंतू तक्रारदार यांना लोकसेवकास लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दिनांक १०/०७/२०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथे प्रत्यक्ष येवून तक्रार दिली.<br><br>प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक १५/०७/२०२५ रोजी पंचासमक्ष पडताळणी कारवाई केली असता, लोकसेवक यांनी प्रत्यक्ष भेटी दरम्यान तक्रारदार यांच्याकडे त्यांच्या कामाकरीता रू. १,१०,०००/- लाचेची मागणी करून लाच स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार दिनांक १६/०७/२०२५ रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक यांना तक्रारदार यांचेकडुन आगाऊ लाचेची रक्कम रू. ५०,०००/- स्वीकारताना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. म्हणुन लोकसेवक यांच्याविरूध्द भ्र.प्र.अधि. १९८८ चे कलम ७ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. |

**तपास अधिकारी :- श्री. निलेश पाटील, पोलीस निरीक्षक** **पर्यवेक्षक अधिकारी :- श्री. कृष्णा मेखले, पोलीस निरीक्षक**

मार्गदर्शन अधिकारी :- श्री. संदीप दिवाण, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
श्री. राजेंद्र गणपत सांगळे, अपर पोलीस उप आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

( अनिल तुकाराम घेरडीकर)
अपर पोलीस उप आयुक्त (१),
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क :- लाचलुचपत प्रतिबंधकविभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.**

**टोलफ्री क्र.** १०६४, दूरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८

**वेबसाईट** :– acbmaharashtra.gov.in, **ईमेल** :– acbwebmail@mahapolice.gov.in

**ईमेल** :– addlcpacbmumbai@mahapolice.gov.in

**फेसबुक** :– www.facebook.com - Maharashtra ACB **मोबाईल ॲप** :– www.acbmaharashtra.net